# पुणे जिल्ह्याच्या औद्योगिक विकासामध्ये जिल्हा उद्योग केंद्राच्या योजनांचे योगदान

**प्रा. अनिल रमेश पाचकुडके**
*डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अमरावती.*

**प्रा. डॉ. अरुण गो. हरणे**
*प्राध्यापक वाणिज्य विभाग*
*श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती*

**सारांश :**

प्रस्तुत संशोधनाचा मुख्य उद्देश पुणे जिल्ह्यातील जिल्हा उद्योग केंद्रमार्फत राबविलेल्या योजनांचा पुणे जिल्ह्याचा औद्योगिक विकासातील परामर्श जाणून घेणे हा आहे. औद्योगिक क्षेत्राला लागणारे औद्योगिक कौशल्य व भांडवलाचा पुरवठा जो जिल्हा उद्योग केंद्राच्या योजनांचा माध्यमातुन केला जातो. याचा प्रत्यक्ष फायदा त्या जिल्ह्याचा औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी होत आहे किंवा नाही त्यामुळे जिल्हा उद्योग केंद्राचे स्थान निश्चितच मोलाचे आहे किंवा नाही हे जाणून घेणे हा आहे.

**प्रस्तावना :**

भारतात जिल्हा उद्योग केंद्राची स्थापनी ही जिल्हा स्तरावर 1977 च्या औद्योगिक मितीच्या आधारावर करण्याचे ठरविले देशातील प्रत्येक जिल्हयात उद्योग केंद्र स्थापन करण्याचा निर्णय घेतला गेला आणि 1 मे 1978 ला जिल्हा उद्योग केंद्राची स्थापना झाली. स्थापनेचा मुख्य उद्देश शहरी आणि ग्रामिण भागातील उद्योगांचे एक जाळे निर्माण करणे हा होता आणि त्याप्रमाणे केंद्र सरकार ने राज्य सरकारला आदेश दिले होते आणि त्यामुळे महाराष्ट्र राज्याच्या 34 जिल्हयांमध्ये जिल्हा उद्योग केंद्र ची स्थापना झाली आणि अत्यंत चांगल्या पध्दतीने कार्य हे करीत आहे.

जिल्हा उद्योग केंद्र हे कुशल उद्योजक निर्मित करण्याकरिता सर्व प्रकारची सहायत्ता करणे, स्थापनेचे लाईसेन्स सोप्या पध्दतीने देते. त्याचबरोबर ग्रामिण भागामध्ये उद्योग स्थापन करण्यासाठी कुशल लोकांना प्रोत्साहित करते, मध्यवर्ती कार्य करित आहे. महाराष्ट्रातील सर्वच्या सर्व जिल्हयात ही केंद्रे स्थापन करण्यात आले आहेत. उद्योजकता विकास करण्याच्या दृष्टीने मध्यवर्ती केंद्र सरकारने जी संरक्षणातक चौकट उभारली त्यामध्ये जिल्हा उद्योग केंद्रांला अतिशय महत्वाचे स्थान आहे.

**पुणे :**

प्राचीन इतिहास असलेला हा जिल्हा ताम्रयुगातील जोर्वे संस्कृतीच्या खुणा मिरवतो. त्या काळात भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरून जाणारे व्यापारी मार्ग या जिल्ह्यातून जात होते. म्हणूनच जुन्नर हे मोठे व्यापारी केंद्र झाले होते. विशेषतः जुन्नर आणि काल येथील लेणी याचा उल्लेख थेट

२००० वर्षांपूर्वी आढळून येतो. १३ वे शतक ते १७ वे शतक या हा भाग यवनांच्या अधिपत्याखाली होता. १६ व्या शतकात इथे बराच काळ निजामशाही होती निजामशाहीचा सरदार मलिक अंबर यांने जुन्नर ही आपली दख्खनची राजधानी केली होती. पुणे आणि सुपे हे प्रांत मालोजी भोसले यांची जहागीर होती. निजामशहाच्या पाडवा नंतर शहाजी भोसले बंग्लोरला गेलो. पुण्याची जहागीर सांभाळण्यासाठी जिजाबाई छोट्या शिवाजी सह पुण्याच्या लाल महालात राहत होत्या. १७ व्या शतकानंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी पुणे जिल्ह्यात स्वराज्याचा पाया घातला. नंतरच्या काळात पुणे हे महत्त्वाचे राजकीय केंद्र बनले. १८ व्या शतकात पुण्यावर पेशव्यांचे राज्य होते. पुण्याजवळ आँध हेसंस्थान होते. आता तो पुण्यातील एक उच्चभू भाग बनला आहे.

**संशोधनाची उद्दीष्टये -**

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील उदि निश्चित करण्यात आली आहेत.

1) पुणे जिल्हा उद्योग केंद्राचे स्वरूप अभ्यासणे.
2) पुणे जिल्ह्यातील जिल्हा उद्योग केंद्रासमोर येणाऱ्या समस्याचा अभ्यास करणे,
3) पुणे जिल्ह्यातील जिल्हा उद्योग केंद्रा मार्फत राबविलेल्या योजनांचा अभ्यास करणे.
4) पुणे जिल्ह्यातील जिल्हा उद्योग केंद्राचे राबविलेल्या योजनांची उपयोगीता व यशस्वीता जाणून घेणे
5) पुणे जिल्ह्यातील जिल्हा उद्योग केंद्रानी पुरविलेल्या सुविधाचा सातत्यपूर्ण वापराबाबत आढावा घेणे.

**गृहितकृत्य** :-

सदर अध्ययनासाठी पुढील गृहितकृत्य मांडले पुणे जिल्ह्यातील औद्योगिक विकास लक्षात घेता जिल्हा उद्योग केंद्रामार्फत राबविण्यात येमान्या योजना त्या जिल्ह्याचे विकासाची संभाव्यता लक्षात घेता शतप्रतिशत प्रमाणात यशस्वी झालेल्या आढळत नाहीत.

पुणे जिल्ह्यातील औद्योगिक विकासामधे जिल्हा उद्योग केंद्राचा योजनांचे योगदान" या विषयाला अनुसरून संशोधकाने संशोधन केलेल्या कार्याचा व इतर प्रकाशीत साहित्याचा आढावा घेणे आवश्यक आहे. त्यामुळे उपलब्ध संदर्भ साहित्याचा आढावा संक्षिप्त स्वरुपात.

पुढील प्रमाणे

**सदार ए. बी. (१९८६)**

सदर अभ्यासकाने "विदर्भातील जिल्हा उद्योग केंद्राच्या कार्याचा औद्योगिक विकासावर झालेला परिमाण (१९७८-८५)" या संशोधनात जिल्हा उद्योग केंद्राच्या कार्याचा विदर्भातील विकासावर एकंदरीत विदर्भ विभागाच्या औद्योगिक विकासासाठी जिल्हा उद्योग केंद्र फार मोठे योगदान सिध्द झालेले नाही. संसाधनांची विपुलता असुनही

पुरेशी औद्योगिक प्रगती न करु शकलेल्या या क्षेत्रात जिल्हा उद्योग केंद्राकडून फार मोठी अपेक्षा आहे. आपल्या प्रचलीत कार्यपध्दतीत लवचिकता आणून उद्योग भिमुख व स्थानिक उद्योजकांना प्रोत्साहन देण्याच्या योजना या केंद्राने सुरु केल्यास विदर्भाचा कायापालट निश्चित होवू शकतो.

**विषय निवडीचे कारण :-**

प्रस्तूत संशोधनाचा विषय हा पुणे जिल्ह्याच्या औद्योगिक विकासामध्ये जिल्हा उद्योग केंद्राच्या योजनांचे योगदान आणि त्याचे मुल्यामापण अभ्यासणे आहे. विशेषतः जिल्हा उद्योग केंद्र या संस्थेद्वारे महाराष्ट्र शासनाने उद्योगांचा विकासासाठी ज्या विविध योजना सेवा, सुविधा, उद्योग केंद्राना उपलब्ध करुन दिल्या आहेत. त्या योजनामुळे व सुविधेमुळे औद्योगिक विकासाची गती वाढली किंवा नाही. त्यांची माहिती घेणे त्यामधील विविध घटकांचा अभ्यास करण्यासाठी या विषयाची निवड केली आहे.

**विषयी निवडीची पुढील मुख्य कारणे आहे :-**

1) बेकारीतील वाढ ही सध्याची सर्वात मोठी समस्या ही भेडसावत आहे.
2) औद्योगिक विकासाचा वेग वाढविण्याची आवश्यकता आहे.
3) रोजगार निर्मिती वाढविण्यासाठी पुरक सोयी सुविधेत वाढ करणे आवश्यक आहे.
4) अलीकडील कालावधीत या विषयाच्या संशोधनाचा आभाव दिसून येते.

**संशोधन पध्दती :-**

संशोधन पध्दती म्हणजे तथ्य व तत्वे शोधण्यासाठी करण्यात येणारी चिकित्सा किंवा परिश्रम किंवा एखादी गोष्ट शोधून काढण्यासाठी सतत पध्दतशिर केलेले परिश्रम होय. अध्ययन विषयक ने निष्कर्श सिद्धांत मान्यवर कर त्याचे प्रमाण्य पुन्हा पुन्हा परिक्षण पाहण्याचे कार्य संशोधन पध्दतीत केले जाते. नव्याने उजेडात आलेल्या तम्याच्या आधारे प्रस्थापित स्वीकृत निष्कर्श व सिद्धांताचे पूर्ण प्रशिक्षण करण्याच्या हेतूने चिकित्सक व सखोल चौकशी किया प्रयोग करणे म्हणजे संशोधन पध्दती होय.

**प्रस्तुत संशोधनामध्ये पुणे जिल्ह्यातील जिल्हा उद्योग केंद्रामार्फत राबविलेल्या योजनांपैकी पुढील दोन योजनांचे अभ्यास केला आहे.**

**१) सुधारित बीज भांडवल योजना-**

या योजनेअंतर्गत किमान 7 वा वर्ग पास असलेल्या आणि 18 वर्षे ते 50 वर्षे वयोगटातील बेरोजगार लोकांना या योजनेचा लाभ घेता येतो. या योजनेअंतर्गत व्यवसाय /सेवा/उद्योग या प्रकारातील 25 लक्ष प्रकल्प मर्यादा असलेली कर्ज प्रकरणे मंजुरीकरिता शिफारस करण्यात येत असून अर्जदाराला

15 टक्के मार्जिन मनी म्हणजेच जास्तीत जास्त रुपये 3.75 लक्ष 6 टक्के दराने वितरीत केले जाते.

**२) पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम**

ग्रामीण व शहरी भागात रोजगारांच्या संधी निर्माण होण्याकरीता, पंतप्रधान रोजगार निर्मिती योजना संपूर्ण भारतात दिनांक २ ऑक्टोंबर २००८ पासून राबविण्यात येत आहे. या योजनेत सेवा उद्योग यांचेकरीता प्रकल्प मर्यादा क्रमश: रुपये १०.०० लाख व रुपये २५.०० लाख एवढी आहे.


सन २००८-०९ ते मार्च २०१२ पावेतो ५५ लाभार्थ्यांवर रुपये १०१.६० लाख रक्कम मार्जीन मनी रुपाने वाटप करण्यात आलेली आहे.

वरिल योजनांचा आकडेवारी व स्तंभालेखच्या माध्यमातून स्पष्ट करण्यात येईल.

**सुधारित बीज भांडवल योजना**

| **वर्ष** | **उद्योगांची संख्या** | **योजनेवर झालेला खर्च रु. (लक्ष मध्ये)** |
|---|---|---|
| २०१५ | ११२ | ९.५०.०१ |
| २०१६ | १४० | १०.०३१.२ |
| २०१७ | १३२ | १०.९०.०७ |
| २०१८ | १४४ | १२.३६.९५ |
| २०१९ | ११० | १०.११.०४ |
| २०२० | ६८ | ७.०४.५४ |

जिल्हाउद्योग केंद्र पुणे





उपरोक्त सारणी वरून असे निर्देशनात येते की संशोधन क्षेत्रामध्ये जिल्हा उद्योग केंद्र मार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या माध्यमातून जे उद्योग उभे होत आहेत त्या उद्योगाच्या संख्येमध्ये पाहिजे तेवढ्या प्रमाणामध्ये वाढ झालेली दिसून येत नाही

**पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम**

| वर्ष | लाभार्थी संख्या | शासनाने वितरीत केलेले अनुदान रु. (लक्ष मध्ये) |
|---|---|---|
| २०१६-१७ | ७९ | |
| २०१७-१८ | १३० | |
| २०१८-१९ | १३४ | |
| २०१९-२० | ८५ | |

जिल्हाउद्योग केंद्र पुणे




उपरोक्त सारणी वरून असे बघावयास मिळत आहे की जिल्हा उद्योग केंद्राचा योजनांचा रोजगार निर्मितीसाठी जो निधी लागत आहे दरवर्षी मिळणाऱ्या निधीमध्ये तफावत आढळून येत आहे आणि ह्याप्रमाणे बेरोजगारी ही वाढत आहे पण पाहिजे तेवढ्या प्रमाणामध्ये रोजगार निर्मिती होताना दिसत नाही पण जिल्हा उद्योग केंद्र मार्फत राबविण्यात येणार्या योजना मुळे थोड्याफार प्रमाणामध्ये रोजगार निर्मिती हे होताना दिसून येत आहे.

**निष्कर्ष:-**

पुणे विभागातील औद्योगिक क्षेत्राची स्थिती बघता औद्योगिक क्षेत्र जास्त विकशित आहे खेड्यांच्या तुलनेत पुणे शहरात रोजगार अधिक संधी या जिल्हा उद्योग केंद्रामुळे निर्माण झाल्यामुळे सुशीक्षित बेरोजगार उद्योगाकडे आकर्षित होताना दिसतात पण मोठ्या प्रमाणामध्ये सुशीक्षित बेरोजगार हे जिल्हा उद्योग केंद्र कडे प्रशिक्षणासाठी व उद्योगासाठी कर्जाची मागणी करतात परंतु त्यांना पाहिजे तेवढ्या प्रमाणामध्ये कर्ज हे मिळालेले दिसून येत नाही तसेच पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमामुळे सुशीक्षित बेरोजगार कर्मचाऱ्यांच्या कौशल्यात वाढ झालेली दिसून येते आणि त्या माध्यमातून त्या योजनेच्या माध्यमातून त्याना रोजगार मिळालेला निर्देशनात येतो.

**शिफारशी:-**

सदर अभ्यासावरून जे निष्कर्ष निघाले त्यानुसार पुढील शिफारशी सुचविण्यात येत आहे.

१) जिल्हा उद्योग केंद्राच्या आधारे औद्योगिक विकासासाठी विविध योजना राबविण्यात याव्यात.

२) जिल्हा उद्योग केंद्राच्या कार्यामध्ये होणारा राजकीय हस्तक्षेप थांबवा.

३) जिल्हा उद्योग केंद्रामार्फत बेरोजगारांना प्रशिक्षणाची देखील संधी उपलब्ध करुन देण्यात यावी व त्यांनी सुरजगारासाठी उत्तेजित करावे

**संदर्भ सुची :-**

अ) **ग्रंथ व पुस्तके:-**

१) डॉ. प्रदिप आगलावे प्रकाशन यवतमाळ.. संशोधन पद्धती व शास्त्र, प्रमोद जे विद्या.

२)डॉ. सुधीर बोधनकर • डॉ. प्रभाकर देशमुख सामाजीक संशोधन पद्धती, साईनाथ प्रकाशन २०३ उद्योजकता विकास, संकल्पना आणि व्यवहार, पिंपळापुरे अँड क. पटलीशर्स, यवतमाळ.

३) रा. ना. घाटोळे (२००३), समाजशास्त्रातील संशोधन तत्वे पध्दती, मंगेश प्रकाशन, नागपूर

४) कन्हाड बी.ए. (जानेवारी २००७) शास्त्रीय संशोधन पध्दती पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिकेशन, नवी दिल्ली.

५)डॉ. संतोष सदार(२००१) विदर्भाचा औद्योगिक विकास, बोके प्रकाशन, गांधी नगर, अमरावती.

ब) वर्तमानपत्रे :-

१)**Business Standard**

२)**Time of India**

३)लोकमत

४) महाराष्ट्र टाईम्स

क) मासिके

१) योजना

२) प्रतियोगीता दर्पण

३) उद्योजकत

ड) संकेतस्थळे :

१) **www.dic.gov. / www.inflibnet.**

२)**www.msme.maharashtragovt**

३) **MCED.Org**

४)**www.udyogadharorg**